नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४५ Issue - 45 | वार मंगळवार दि. १ जुलै २०२५ Blow- Tuesday Date 1 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर

### राज्यात पायाभूत प्रकल्पांना बळ; सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एक हजार कोटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी दोन्ही सभागृहांत ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवत राज्य सरकारने या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून महापालिका आणि जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यात मेट्रो, रस्ते, सिंचन योजना यांसारख्या पायाभूत प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. पुढील आठवड्यात या मागण्यांवर चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील.

या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी रुपयांच्या मागण्या अनिवार्य खर्चाच्या तर ३४ हजार ६६१ कोटी रुपयांच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आणि ३ हजार ६६४ कोटी रुपयांच्या मागण्या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसाह्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने आहेत. पंधराव्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार, नगरविकास आणि ग्रामविकास विभागाला ११ हजार ४२ कोटी रुपयांची अनुदाने दिली जाणार आहेत. तसेच नागरी पायाभूत विकास निधींच्या यनोजनेअंतर्गत महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती यांना एक हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

मेट्रो प्रकल्पांना प्राधान्य...

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पुरवणी मागण्या सादर केल्या. त्यात विविध विभागांसाठी पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. त्यातही मागण्यांमध्ये मेट्रो प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

**पुरवणी मागण्यांत आणखी काय ?**

३,२२८ कोटी रुपये: मेट्रो प्रकल्प, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांना मुद्रांक शुल्क अधिभार परतावा म्हणून तरतूद

२,२४० कोटी रुपये: मुंबई मेट्रो प्रकल्प, वाहतूक दळणवळण, भुयारी मार्ग बांधण्यासाठी राज्य सरकारच्या हिश्श्याची दुय्यम कर्जाची रक्कम

२,१८२ कोटी रुपये: राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून राज्य सरकारमार्फत सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भाग भांडवलासाठी 'मार्जिन मनी लोन'



२,१५० कोटी रुपये: केंद्राकडून राज्यांना भांडवली खर्चासाठी ५० वर्षांसाठी दिले जाणारे विशेष सहाय्य

२,०९६ कोटी रुपये: अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, तसेच सिंचन प्रकल्पांच्या वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी नाबार्डकडून मिळालेल्या कर्जाची तरतूद

२,००० कोटी रुपये: जिल्हा मार्ग, रस्ते आणि पुलांसाठी तरतूद

३,५०० कोटी रुपये: सामाजिक न्याय विभागाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी

१,३०० कोटी रुपये: इतरत मागास आणि विशेष मागास टे प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिक आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी तरतूद

१,००० कोटी रुपये: राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या सवलत मूल्यांची हे प्रतिपूर्तीसाठी तरतूद

९८९ कोटी रुपये: केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी

**पुरवणी मागण्यांतील विभागनिहाय तरतुदी**

(आकडे कोटी रुपयांमध्ये)

नगरविकास - १५,४६५

सार्वजनिक बांधकाम - ९,०६८

ग्रामविकास - ४,७३३

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य - ३,७९८

सहकार, पणन, वस्त्रोद्योग - २,८३५

महिला आणि बालविकास -२,६६५

जलसंपदा -२,६६३

गृह -१,४६१

विधी आणि न्याय - १,३५३

नाशिक येथे येत्या दोन वर्षांत होत असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन आणि अंमलबजावणी खर्चासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## जुलै महिन्याच्या सुरुवातीला पावसाची तुफान हजेरी



मुंबई : दक्षिणेकडून उत्तरेकडे सरसावलेल्या मान्सूनने उत्तरेकडील राज्यांमध्ये जोरदार हजेरी लावली आहे. हिमाचलमध्ये पावसाने हाहाकार उडाला असून भूस्खलनामुळे १२९ रस्त्यांवरील वाहनांचे वाहतूक थांबली आहे. बिहार उत्तराखंड झारखंड मध्य प्रदेश व राजस्थानसारख्या राज्यांना पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले आहेत. दरम्यान महाराष्ट्रातही पुढील ४ दिवस दमदार पाऊस होणार असल्याचं हवामान विभागाने सांगितले. जुलै महिन्याच्या सुरुवातीला महाराष्ट्रात पावसाचे हायअलर्ट देण्यात आले आहेत.

राज्यभरात आज मराठवाड्यासह पश्चिम व मध्य महाराष्ट्रात पावसाने जोरदार हजेरी लावली. छत्रपती संभाजीनगरसह बीड, जालन्यासह परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली भागात पाऊस झाला. विदर्भात तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर वाशिमसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडला.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील चार दिवस राज्यभरात विविध ठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आले असून कोकण किनारपट्टीसह मुंबई, ठाणे तसेच उत्तर महाराष्ट्र व विदर्भात पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले आहेत. मराठवाड्यातही जोरदार पावसाची शक्यता असून मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. आज संपूर्ण कोकण किनारपट्टीवर पावसाचा येलो अलर्ट असून रायगड ठाण्यातही येलो अलर्ट आहे. पुणे सातारा आणि कोल्हापूरच्या घाट परिसरातही जोरदार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. जळगाव छत्रपती संभाजी नगर अहिल्यानगर बीड जालना परभणी नांदेड हिंगोली लातूर या जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट असून वर्धा नागपूर भंडारा गोंदिया गडचिरोली आणि चंद्रपुरातही पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय.

१ जुलै: रायगड, रत्नागिरी ,सिंधुदुर्ग, नंदुरबार, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती नागपूर भंडारा या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आलाय.

२ जुलै: सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच कोल्हापूर सातारा पुणे व नाशिक घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई ,पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, अमरावती ,वर्धा, नागपूर, चंद्रपूर ,भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना येलो अलर्ट

३ जुलै: रायगड रत्नागिरी तसेच सातारा व पुणे घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व नाशिक घाट परिसर, संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट

४ जुलै: चंद्रपूर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट, उर्वरित विदर्भात यलो अलर्ट, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेडसह तळकोकण व पुणे, सातारा व कोल्हापूर घाट परिसरात पावसाचा यलो अलर्ट

## व्हीआयपी दर्शनासाठी विठ्ठल मंदिर समितीवर येतोय दबाव
## व्हीआयपी दर्शन बंद बाबत जिल्हाधिकारी यांनी काढले आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

देवाच्या व्हीआयपी दर्शनासाठी समितीवर राजकीय दबाव येत असल्याची तक्रार तक्रारीनंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्हीआयपी दर्शन बंद करण्याचे आदेश मंदिर समितीला दिले आहेत.

श्री विठ्ठल उपनिय दर्शनासाठी भाविकांची आता मोठी गर्दी होत आहे या गर्दीत व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याची आदेश घेण्यात आला होता. मात्र व्हीआयपी दर्शनासाठी मंदिर समितीवर राजकीय दबाव येत असल्याची तक्रार येत होत्या याची दखल घेऊन श्री विठ्ठल-रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला आदेश काढले आहेत.



आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरीत भाविक मोठ्या संख्येने दाखल होऊ लागले आहेत. सात दिवसावर आषाढी यात्रा येत असल्याने आता संकेत वाढ होऊ लागलेली अशा परिस्थितीत दूरवरून भाविक येत असतात त्यांना दर्शनाला लाभ चांगल्या प्रकारे घेता यावा यासाठी व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. पण काही जणांकडून व्हीआयपी दर्शनाला सोडण्याचा हट्टच होत आहे राजकीय दबाव आणला जात आहे. राजकीय दबाव आणल्याची असल्याची तक्रार मंदिर समितीवर आणला जात आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी आता भाविकांची गर्दी होऊ लागली होती या गर्दीत व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र व्हीआयपी दर्शनासाठी मंदिर समितीवर राजकीय दबाव येत असल्याच्या तक्रारी येत होत्या याची दखल घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची व्हीआयपी दर्शन बंद करण्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला आदेश काढले आहेत.

## आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटीच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या (१५० किमी पेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पूर्ण तिकीट धारी (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात १ जुलैपासून करण्यात येत आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.



१ जूनला एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे. अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

आषाढी एकादशी आणि गणपती उत्सवात प्रवाशांना लाभ

येत्या आषाढी एकादशीला आणि गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो . राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बसेसचे आरक्षण प्रवाशांनी केल्यास त्यांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत उद्यापासून (१ जुलै) लागू होत आहे. तथापि जादा बसेससाठी ही सवलत लागू असणार नाही. तसेच गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमानी प्रवाशांना देखील आगाऊ आरक्षण केल्यानंतर या तिकिटाचा लाभ घेता येऊ शकतो. मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित इ-शिवनेरी बसमधील पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, npublic.msrtcors.com या एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा msrtc Bus Reservation या मोबाईल पद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५ टक्के सवलत प्राप्त करता येऊ शकते.

### धर्मपुरी येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले पालखीचे स्वागत

### नातेपुते येथे पालखीचा आज मुक्काम

## हरी नामाच्या गजरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (उ.मा.का.) : आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आज सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.

धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. गोरे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, माजी आमदार राम सातपुते, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलीच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील नगारा व अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

पालखी स्वागतानंतर पालकमंत्री गोरे व प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधीनी हरी नामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर काही अंतर चालत गेले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सोनिया यांनी फुगडी खेळत रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल नामाचा जयघोष केला. तसेच पालकमंत्री महोदय व माजी आमदार राम सातपुते यांनी ही फुगडी खेळली.

**सातारा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण निरोप**

सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.०० वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी , सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी यासणी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, फलटणचे उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भक्तीमय वातावरणात भावपूर्ण निरोप दिला.

जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल नामघोषाने आसमंत दुमदुमला...

टाळी वाजवावी, गुढी उभी रहावी,

वाट ती चालावी पंढरीची

या संत वचनानुसार टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने जय हरी विठ्ठल... जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा... तुकाराम चा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी पंढरीचे अंतर एक एक पाऊल जवळ करीत होता.



**वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज, वारकऱ्यांसाठी फूट मसाजची व्यवस्था**

पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. हिरकणी कक्षाच्या माध्यमातून महिला वारकरी मंडळी तसेच लहान मुलांसाठी उत्कृष्ट सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच वारकऱ्यांना पायी चालून त्रास होऊ शकतो त्यामुळे त्यांना आराम मिळावा यासाठी फूट मसाज मशीन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे.

धर्मपुरी येथे पालखी अगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता.

**दर्शनासाठी भाविकांची गर्दी**

सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती.

**नातेपुते येथे पालखीचा मुक्काम**

धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलीची पालखी नातेपुते कडे मार्गस्थ झाली.

**वारकऱ्यांसाठी विविध सुविधांचे उद्घाटन**

आषाढी वारी कालावधी ग्राम विकास विभागामार्फत धर्मपुरी येथे ग्रामविकास विभागाने वारकरी सेवा मसाज केंद्र, वैद्यकीय सेवा कक्ष, हिरकणी कक्ष, मुख्यमंत्री आरोग्य रथ, मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्र, मोफत मोबाईल चार्जिंग पॉईंट, १०८ ॲम्ब्युलन्स सेवांचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी केले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### प्रकल्पांना बळ

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पुरवणी मागण्या सादर केल्या. त्यात विविध विभागांसाठी पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत. त्यातही मागण्यांमध्ये मेट्रो प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी दोन्ही सभागृहांत ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवत राज्य सरकारने या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून महापालिका आणि जिल्हा परिषदांना निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यात मेट्रो, रस्ते, सिंचन योजना यांसारख्या पायाभूत प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. पुढील आठवड्यात या मागण्यांवर चर्चा होऊन त्या मंजूर केल्या जातील. या पुरवणी मागण्यांपैकी १९ हजार १८३ कोटी रुपयांच्या मागण्या अनिवार्य खर्चाच्या तर ३४ हजार ६६१ कोटी रुपयांच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आणि ३ हजार ६६४ कोटी रुपयांच्या मागण्या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत अर्थसाह्य उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने आहेत. पंधराव्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार, नगरविकास आणि ग्रामविकास विभागाला ११ हजार ४२ कोटी रुपयांची अनुदाने दिली जाणार आहेत. तसेच नागरी पायाभूत विकास निधींच्या यनोजनेअंतर्गत महापालिका, नगरपालिका, नगर पंचायती यांना एक हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

# अस्मितादर्शकार डॉ. पानतावणे यांना विनम्र अभिवादन....!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आज पद्मश्री डॉ गंगाधर पानतावणे यांचा जन्मदिवस आहे. त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन.

आंबेडकर चळवळीतील जेष्ठ विचारवंत, साहित्यिक, उत्तम संपादक, प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे. कृतिशील जीवन कार्य असणारे. आंबेडकर चळवळीतील प्रत्येक विषयाचे ज्ञान दालन त्यांनी तयार केले. अनेक कवी, लेखक, नाटकार, समिक्षक व विचारवंत त्यानी घडविले. त्यांचे प्रमूख माध्यम होते त्यांचे लोकप्रिय नियतकालिक अस्मितादर्श त्रैमासिक. आयुष्यभर पानतावणेसरांनी आंबेडकरी विचारनिष्ठा जपल्या, वृद्धिंगत केल्या. प्रचार प्रसार केला. यासाठी लेख, पुस्तके व भाषणे दिली. एकूणच आंबेडकरी समाजाला न्याय देण्यासाठी साहित्य संघर्ष सुरू ठेवला. अस्मितादर्शच्या माध्यम उभे केले. विज्ञानवादी व मानवतावादी विचारांची रसद पुरवली. आंबेडकरी वाचनसंस्कृतीला पाठबळ दिले. मानवी हक्क व प्रतिष्ठेसाठी लिहित राहिले. मानवी जीवनातील ओंगळ कुरूप आणि वंचित असलेल्या घटकांचा आलेख उभा केला. अस्मितादर्शने अस्पृश्यांच्या, पददलितांच्या शब्दांचे, भावनांचे, विचारांचे प्रकाशघर उभे केले. डॉ. बाबासाहेबांच्या क्रांतीगर्भ विचारांचा अन्वय व भाष्य व्यक्त करणारे लेखन सातत्याने प्रकाशित करत होते व आहे. परिवर्तनवादी विचाराचा शोध निरंतर कायम ठेवला. सर्व परिवर्तनवादी साहित्य व लेखकांच्या वांग्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मूल्यात्मक लेखनाला प्रसिद्धी दिली. आंबेडकरवादी बांधिलकी मुळे नियतकालिक उभे राहिले. आंबेडकरांचे व बौद्ध विचार समाजातील सर्वदूर घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत राहिले. अस्मितादर्श चे माध्यमाद्वारे वेळोवेळी दिशादर्शन करण्यासाठी झिजले. हे खरे आहे. विचार वाहून नेण्यासाठी सदैव तत्पर राहाणारा पदयात्री. बुद्ध, फुले, शाहू, आणि आंबेडकर त्यांचे आदर्श होते. साहित्यातील सर्व लढायाना ते सज्ज असत. अभ्यासपूर्ण व चिंनगर्भ लेख व भाषणातून अनेकांची ते भंबेरी



उडवून देत असत. नामातंराचा लढा, रिडल्सचा प्रश्न, रमाबाई आंबेडकर गोळीबार, अरूण शौरीना फॉल्स गॉड सारख्या टिकेला ऊत्तर अशा आणि अनेक समस्यांना वैचारिक लढ्यात कायम अग्रेसर राहिले. गेली चार ते पाच दशके आंबेडकर चळवळीत ते अस्मितादर्शच्या माध्यमातून विविध घटकापर्यंत पोचत होते. अनेकांना त्यांनी प्रतिष्ठा व प्रतिमा निर्माण केल्या. साहित्य क्षेत्रात दलित तथा फुले शाहू आंबेडकर साहित्याती प्रमेय, सिद्धांत व प्रतिमानांची चर्चा घडवून आणली. विद्यार्जनाबरोबरच डॉ. बाबासाहेबांचे विचार प्रभावी व प्रगल्भ केले. मुखवट्याचे साहित्य नको फक्त आणि फक्त आंबेडकरी साहित्य हवे हा नारा प्रभावी केला.

बाबासाहेबांचा विचार व धम्म विचार गावोगाव नेला. ते नियतकालिकाच्या माध्यमातून. माणसं जागृत केली. बाबासाहेंबाचा विचार समजताच लोक निळा झेंडा खाद्यावर घेऊन संघर्ष सन्मूख झाली तसेच वैचारिक लढा परिपक्व व सर्जनशील केला. नव्या वाग्डमयीन प्रवृत्ती व नव्या जाणिवांचा सांस्कृतिक मंच खूला केला. वैचारिक, समीक्षत्मक व संशोधनपर लेखनाला प्राधान्य देत. नवोदित लेखकांचा वर्ग निर्माण केला. हे सत्य आहे.

आंबेडकरी संस्कृती वृध्दिगत करण्यासाठी एखादा विषय अभ्यासपूर्ण मांडणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत. ते उत्तम वक्ते होते. त्यांचे भाषण सामान्य माणसाला खिळवून ठेवत. तर अभ्यासकांना विविध बौद्धसंस्कृतीतील संकलपना, सिद्धांत व प्रमेय सहज सापडत असत. प्राध्यापक पद त्यानी खूबीने निभावले व एक विचारवंत म्हणून उदयास आले. एखाद्याला लेखक सहज होता येईल परंतू विचारवंत होणे खूप कठीन गोष्ट आहे.

दुसरे असे की,साहित्य चळवळीत पानतावणें सरांनी समाज, संस्कृती, धर्म, इतिहास, शिक्षण, बुद्धिवाद, तत्वज्ञान याक्षेत्रातील आंदोलने उभी केली. बुद्धिवादाच्या नव्या नव्या संलपनाचा चर्चा सुरू केला. चळवळीचा अग्नी विझू दिला नाही. नव्या अभ्यासक व विद्यार्थ्याना आंबेडकरवादी प्रोत्साहान दिले. नवा परिवर्तनवादी विचार रूजावा. यासाठी ते सतत क्रियाशील राहिले. यासाठी त्यानी साहित्य, समेंलने व साहित्यिकांना प्रोत्साहान दिले. काही असो, आंबेडकरवादी चळवळ ही निर्वीष व अहंकारमुक्त असल्याशिवाय निर्मितीची नवी क्षेत्रे निर्माण करता येणार नाहीत. यावर आमचा दृढ विश्वास आहे.

सध्या अस्मितादर्श हे त्यांची कन्या निवेदिता पानतावणे संपादिका आहेत.

त्यांचे जन्मदिनानिमित्त पुनश्य विनम्र अभिवादन....!

**– डॉ. दत्तात्रय गायकवाड,**
**समीक्षा फाउंडेशन, पुणे**

# इस्कॉन सोलापूर तर्फे २ जुलै रोजी भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : येथील अक्कलकोट रोड स्थित व्रजधाम श्री श्री राधा दामोदर मंदिर (इस्कॉन) सोलापूर तर्फे, दरवर्षीप्रमाणे यंदाही बुधवार दिनांक २ जुलै २०२५ रोजी भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या भव्य जगन्नाथ रथयात्रेकरिता इस्कॉन संस्थापक आचार्य श्री भक्तीवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे शिष्य, इस्कॉन पदयात्रा प्रमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवनगौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात कीर्तन सम्राट त्रिदंडी संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज, दक्षिण आफ्रिकेचे परम पूज्य राम गोविंद स्वामी महाराज, अमेरीकेचे परम पूज्य श्रीकृष्ण चैतन्य स्वामी महाराज आणि यासोबतच महाराष्ट्रातील विविध भागातून सुद्धा अनेक वरिष्ठ भक्तांची मांदियाळी सोलापूर येथे येणार आहे.

पूर्वी जगन्नाय रथयात्रा फक्त जगन्नाथ पुरी पर्यंतच सीमित होती परंतु भारतातील जगविख्यात संत, इस्कॉनचे संस्थापक आचार्य भक्तीवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांच्या असीम कृपेने तीच जगन्नाथ रथयात्रा जगातल्या १६० हून अधिक देशांमध्ये काढल्या जात आहेत.

या संपूर्ण सृष्टीचे स्वामी भगवान जगन्नाथ हे बलदेव व सुभद्रा महाराणी समवेत सार्वजनिक स्वरूपामध्ये, आपल्या स्थावर आरूढ होऊन शहरातील रस्त्यांवर संपूर्ण प्राणीमात्रांना दर्शन देण्यासाठी येतात.

ब्रम्हांडपुराणात सांगितले आहे की, जी व्यक्ती भगवान जगन्नाथांच्या रथयात्रा उत्सवाचे दर्शन करतो, रथावर आरुढ भगवंतांच्या स्वागतासाठी आदरपूर्वक उभा राहतो, जगन्नाथ भगवंतांच्या रथाची दोरी ओढतो, रथासोबत काही पावले चालतो त्याची सर्व दु:खे व पाप नष्ट होऊन जातात आणि त्याच्या जीवन समाप्तीनंतर त्याला वैकुंठ लोकांची प्राप्ती होते.

भगवान जगन्नाथ रथयात्रेचे उद्घाटन बुधवार दिनांक २ जुलै २०२५ दुपारी १.०० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथून होईल त्यानंतर चार हुतात्मा, सरस्वती चौक, मेर्कॅनिक चौक, पांजरापोळ चौक, इडछड टेलिफोन भवन, चाटी गल्ली, सराफ बाजार, मधला मारुती, कौंतम चौक, कन्ना चौक, राजेंद्र चौक, जोड बसवण्णा चौक, भद्रावती पेठ, मार्कडेय रुग्णालय, दत्तनगर, दाजी पेठ यानंतर श्री वेंकटेश्वर मंदिर मंगल कार्यालय येथे समापन आणि सर्वांसाठी महाप्रसाद होणार आहे.

जगन्नाथ रथयात्रेच्या उद्घाटनासाठी आणि प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना. जयकुमार गोरे साहेब पालक मंत्री जिल्हा सोलापूर, खासदार, माननीय प्रणिती ताई शिंदे, माननीय जिल्हाधिकारी श्री, कुमार आशीर्वाद, माननीय पोलीस आयुक्त श्री एस. राजकुमार, माननीय आयुक्त सोलापूर महानगर पालिका श्री सचिन आंबासे, माननीय आमदार देवेंद्र कोठे, माननीय आमदार सुभाषराव देशमुख, माननीय आमदार विजयकुमार देशमुख, माननीय आमदार सचिन कल्याणशेट्टी हे उपस्थित राहणार आहेत.

रथयात्रेमध्ये वेगवेगळे अध्यात्मिक देखावे, भगवंतांचा मनमोहक शृंगार, सर्व भक्तांद्वारे भगवान्नामाचा जयघोष, भगवंतांना ५६ भोग नैवेद्य, महाआरती असे भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत

या भव्य जगन्नाथ रथयात्रा महोत्सवासाठी संपूर्ण सोलापूरवासियांनी रथयात्रेमध्ये मोठ्यासंख्येने सहभागी होऊन श्री श्री जगन्नाथ बलदेव आणि सुभद्रा महाराणी यांची असीम कृपा प्राप्त करावी, असे आवाहन इस्कॉन सोलापूरचे अध्यक्ष श्रीमान कृष्णभक्त दास आणि जगन्नाथ रथयात्रा व्यवस्थापन समितीद्वारे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी: ९८२३९२००७२/९३२६९८१५३३/९८७३७७८३९३

# सेवक श्री.लोंढे यांच्या कामाचा इतर सेवकांनी आदर्श घ्यावा–मविप्र संस्था सरचिटणीस ॲड. ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : संस्था दैवत मानून श्री.लोंढे यांनी अतिशय प्रामाणिकपणे व आदर्शवत काम केले आहे .मध्यवर्ती कार्यालयात काम करण्याची संधी त्यांना मिळाली व त्या संधीचे त्यांनी सोने केले . शिक्षक शिक्षकेतर सेवक यांचे प्रश्न हाताळण्याचे व सोडविण्याचे अतिशय जिकरीचे काम त्यांनी केले आहे. काम करीत असताना त्यांनी पारदर्शकता व गोपनीयता पाळली. श्री.लोंढे यांनी अतिशय चांगले काम केले असून त्यांच्या कामाचा इतर सेवकांनी आदर्श घ्यावा असे आव्हान मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड नितीन ठाकरे यांनी केले.

मनेगाव येथील नूतन जवाहर विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय लोंढे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

ॲड. ठाकरे पुढे म्हणाले की, संस्थेच्या संख्यात्मक व गुणात्मक विकासात संस्थेच्या कार्यकारी मंडळाबरोबरच संस्थेचे सभासद, हितचिंतक, देणगीदार तसेच सेवकांचेही मोठे योगदान आहे. त्यामुळेच संस्था आज प्रगतीपथावर आहे व यापुढे राहणार आहे.

**मनेगाव विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक दत्तात्रय लोंढे यांचा सेवापूर्ती सोहळ्याचा कार्यक्रम संपन्न**

श्री. लोंढे हे ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले असून त्यांचा सेवापूर्तीचा सोहळा मातोश्री नर्मदा लॉन्स सिन्नर या ठिकाणी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत होते . व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनिल ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक ड संदीप गुळवे, डॉ. सयाजीराव गायकवाड, विजय पगार, रमेश पिंगळे ,ड रमेशचंद्र बच्छाव, नंदकुमार बनकर, रविंद्र देवरे, प्रविण नाना जाधव, शिवाजी गडाख,ड लक्ष्मण लांडगे,अमित बोरसे, डॉ.प्रसाद सोनवणे,शालनताई सोनवणे, शोभा बोरस्ते, माजी संचालक विजय गडाख, हेमंत नाना वाजे, संस्थेचे सेवक संचालक डॉ. संजय शिंदे, सी.डी. शिंदे, संस्थेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, डॉ. कैलास शिंदे, प्रा. शशिकांत मोगल , श्रीमंत पतसंस्थेचे चेअरमन नारायण वाजे, माजी जि. प.सदस्या सीमंतिनी कोकाटे, अशोक सोनवणे, माजी मुख्याध्यापक गुलाब भामरे, अशोक पिंगळे, शालेय समितीचे अध्यक्ष नितीन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यपिका सिमा हांडगे यांनी केले. सत्कारार्थी लोंढे यांचा परिचय उपशिक्षिका वृषाली खताळ यांनी करून दिला





प्रमुख पाहुण्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपसभापती मोगल, डॉ . एस.के. शिंदे, कवि माणिकराव गोडसे, सागर गुजर, वैभव लोंढे, विजया लोंढे आदीं आपले मनोगत व्यक्त केले.

सत्कारमूर्ती दत्तात्रय व सौ.विजया लोंढे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना श्री. लोंढे म्हणाले की, कर्मवीरांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन सदैव संस्थेसाठी काम केले. आईच्या संस्काराची शिदोरी माझ्या बरोबर होती त्यामुळेच मला काम करणे सोपे गेले. मला माझ्या सरका–यांनी खुप सहकार्य केले. त्यामुळेच मी चांगले काम करू शकलो. तसेच जीवनातील विविध कठीण प्रसंग सांगताना श्री.लोंढे यांना गहीवरून आले.

अध्यक्षीय भाषणात कृष्णाजी भगत म्हणाले की, श्री. लोंढे यांनी शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा वापर करून कामकाज केले. पदाचा अभिमान वाटावा असा ठसा त्यांनी आपल्या कामाचा उमटवला आहे. त्यामुळे ते संस्थाचालक प्रियही सेवक होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल खैरनार व वैशाली वाजे यांनी केले तर आभार प्रदर्शन मविप्र संस्था उपाध्यक्ष विश्वास मोरे यांनी केले. कार्यक्रमास आजी– माजी मुख्याध्यापक,शिक्षक , शिक्षकेतर सेवक, मित्र परिवार, व नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर सेवक व मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.

**शिक्षकांच्या परिश्रमाचे फलित : समाज कल्याण विभागांने केला विशेष सन्मान**

**मान्यवरांच्या हस्ते मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांचा सन्मान**

# सलग तिसऱ्यांदा शासकीय निवासी शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत हॅटट्रिक...




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :

शासनाच्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा या परीक्षेत सन २०२३ ते २०२५ पर्यंत, गोदिंया जिल्ह्यातील एकमेव अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथील विद्यार्थी हे सतत तीन वर्षे शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त करीत आहेत. यावर्षी ही या शाळेने यश प्राप्त करून राज्यात मान राखला आहे. म्हणून सलग तिसऱ्यांदा शासकीय निवासी शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत हॅटट्रिक... मारली आहे. हे अभिमानास्पद आहे.

सदर शाळा ही उपक्रम राबविण्यात अव्वल आहे. नाविन्यपूर्ण कौशल्य विकास करण्यासाठी उपक्रम तसेच वेगवेगळे प्रयोग करीत आहे याची विभागसह जिल्हाला माहिती आहे.

सलग तिसऱ्यांदा माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालयाने समाज कल्याण विभाग मुख्यालय पुणे येथे मंत्री संजय शिरसाठ, प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे, आयुक्त ओम प्रकाश बकोरिया, सर्व विभागाचे उपायुक्त यांच्या प्रमुख उपस्थितीत तत्कालीन गोदिंया जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांच्या मार्गदर्शनात शाळेचा विशेष सन्मान करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांना सन्मान चिन्ह, सन्मान पत्र व शाल श्रीफळ देऊन गौरवण्यात आले.

**शिक्षकांची मेहनत व फलित**

सदर शाळेतील शिक्षक हे दररोज एक तास शिष्यवृत्ती परीक्षेचा तास ठरवून घेतात. प्रत्येक विषयाप्रमाणे सर्व प्रकारचे प्रश्न समाजावून विश्लेषणात्मक विद्यार्थ्यांना स्पष्ट करुन देतात. त्यामुळे ते विद्यार्थ्यांना कळते. अशाप्रकारे विद्यार्थ्यांची सराव प्रक्रिया राबवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने वर्ग घेणारे नीता भलमे, अस्मिता तेलंग, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे आदी शिक्षकांनी शिष्यवृत्ती परीक्षेचे वर्ग घेऊन मुलांना तयार करतात.

**गोदिंया जिल्ह्यातील एकमेव शाळा ही माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण एवढे विद्यार्थी झाले. यात शिक्षक व विद्यार्थी यांची खरी कसोटी आहे. हा गौरव कायम टिकवून ठेवतील ही मनोकामना आहे.**
**– किशोर भोयर, सहाय्यक आयुक्त,**
**समाज कल्याण, गोंदिया.**

**माझ्या शाळेने माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविण्याची परंपरा कायम राखली आहे. याचा अभिमान असून शिक्षकांची मेहनत यामध्ये लागली. सदर परीक्षेसाठी खूप मेहनत असते.**
**– रविशंकर ईठूले, मुख्याध्यापक,**
**शास. निवासी शाळा, नंगपूरामुर्री.**

**शिष्यवृत्ती परीक्षेला असणारे सर्व विषय हे चाणाक्ष पध्दतीने हाताळून त्यावरील प्रश्न सोडविण्यासाठी साध्यासुध्या ट्रीक उपयोगात आणून वापरली जाते. मुलांना समजेल अशी भाषा व पध्दत राबवून शिकविले जाते.**

**या यशाबद्दल समाज कल्याण गोंदिया या कार्यालयाने देखील शाळेचा सन्मान केला. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला. पुढील तयारीसाठी शुभेच्छा दिल्या.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रा : मंदिर, मंदिर परिसर व दर्शन रांगेत १५० अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे

## आयपी, अनॉलॉग व मेगापिक्सल नाईट व्हिजनचे अत्याधुनिक कॅमेरे; कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसर, श्री संत तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, संपूर्ण दर्शन रांग, पत्रा शेड आदी ठिकाणांतील घटना, घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने कायम स्वरुपी व तात्पुरत्या स्वरूपात असे एकूण १५० ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे, मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले आहे, यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत. दर्शन रांगेतील घुसखोरी, तात्काळ आरोग्य व्यवस्था, अनुचित प्रकार घडू नये व इतर घडामोडींवर सीसीटीव्हीची नजर असणार आहे. याशिवाय, नियंत्रण कक्षातून वॉकीटॉकीद्वारे संवाद साधून तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सीसीटीव्हीची खूप मोठी मदत होत आहे. याशिवाय, कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापक यांच्या कार्यालयात देखील या कॅमेऱ्यांचा अक्सेस दिला असल्याने त्यांना मुख्यालयात बसून सर्व घडामोडी पाहता येत आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे परीक्षण करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व श्री संत तुकाराम भवन येथे असे दोन नियंत्रण कक्ष (कंट्रोल रुम) तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये पूर्ण वेळ ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली असून, त्याची जबाबदारी विभाग प्रमुख राजेंद्र घागरे यांचेकडे आहे.

वारकरी भाविकांना केंद्रबिंदू मानून भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज होती, त्या त्या ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आयपी, अनॉलॉग व मेगापिक्सल नाईट व्हिजनचे अत्याधुनिक कॅमेरे आहेत. या सर्व कॅमेराद्वारे चित्रित केलेला डाटा देखील सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था निर्माण केलेली आहे. संबधित कॅमेरे सर्व दिशेस कव्हर करीत असल्याने कोणताही परिसर त्याच्या नजरेतून सुटत नाही. त्यामुळे भाविकांमध्ये सुरक्षितता निर्माण होणार असून, आवश्यक ठिकाणी भाविकांना तात्काळ मदत देखील करता येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.



# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत कल्याणशेट्टी विद्यालयाचे यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयास तालुक्यात दुसरा क्रमांक मिळाल्याबद्दल अक्कलकोट तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात मा. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व सहकारी ज्येष्ठ शिक्षक सूर्यकांत रूगे, रविकिरण दंतकाळे, कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी याना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आला.

यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, उपस्थित होते.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाने सन २०२४२५ या वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सहभाग नोंदवला होता. शासनाच्या परिपत्रकानुसार सर्व बाबी पूर्ण करून ही शाळा विहित निकषात उतरले होते. त्यामुळे शिक्षण विभागातील तज्ञ पथकाने प्रत्यक्ष पाहणी करून मूल्यमापन केले होते. शाळेतील तंत्रशिक्षक व इतर सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभल्यामुळेच हे यश मिळाल्याचे मुख्याध्यापक भरमशेट्टी यांनी यावेळी सांगितले.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी बोलताना काळानुसार शिक्षकांनी सुद्धा बदल स्वीकारले पाहिजे. सध्या शिक्षणात खुप स्पर्धा आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी शिक्षकांची भूमिका खुप महत्त्वाची आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षकांनी अध्यापनात बदल केले पाहिजे असे ते यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात शाळेला यश मिळाल्याबद्दल संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी,संचालक मल्लिकार्जुन मसुती, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.




# निफाडमध्ये हिंदीसक्ती विरोधात अध्यादेशाची होळी व निदर्शने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाडप्रतिनिधी : माजी आमदार अनिल कदम, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन आहेर, ज्येष्ठ नेते भास्करनाना बनकर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय कार्यकर्त्याकडून येथील शिवाजी चौकात हिंदी सक्तीविरोधात निदर्शने करत राज्य सरकारने काढलेल्या अध्यादेशाची होळी करून शासनाचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसेसह निफाड तालुक्यातील मराठी प्रेमी नागरिकांचा उस्फुर्त सहभाग घेत निदर्शने केली. हिंदीची सक्ती चालणार नाही... हिंदू आहोत... हिंदी नाही... म मराठीचा... म महाराष्ट्राचा... या घोषणांनी निफाड शहर दुमदुमले. होते निफाडमधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हिंदी भाषा सक्ती विरोधात आंदोलनास प्रारंभ करण्यात आला. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्यावतीने पोलिस उपनिरीक्षक ईश्वर पाटील यांना अनिल कदम, भास्कर बनकर, नितीन आहेर, दिगंबर गीते यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले.

आंदोलनास ज्येष्ठ नेते भास्करनाना बनकर, वैशालीताई कदम, युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, आशिष शिंदे, निफाड शहरप्रमुख संजय धारराव, करंजगावचे माजी सरपंच खंडू बोडके पाटील, नगरसेवक मुकुंद होळकर, बापूसाहेब कुंदे, सुनील निकाळे, निरज चोरडीया, कैलास धारराव, सुभाष आवारे, शंकर संगमनेरे, पंडित आहेर, आशिष बागुल, ललित गीते, आबा गडाख, भाऊसाहेब केदार, राष्ट्रवादीचे इरफान सय्यद, भूषण शिंदे, अमोल दाते, अरुण डांगळे, किरण सूरवाडे, संतोष आहेर, प्रकाश वाटपाडे, नितीन काळे, प्रकाश महाले, सुनील कदम, रमेश जेवूघाले, महेश क्षीरसागर, समाधान वाघ, राहुल नागरे, तुकाराम उगले, दादा बोरगुडे, शिवाजी तळेकर, काँग्रेसचे दिगंबर गीते, सुहास सुरळीकर, सचिन खडताळे, नईम शेख, दत्तू भुसारे, संतोष बाजारे, रघुनाथ ढोबळे, भाऊसाहेब खालकर, छगन नागरे, श्रीजीत कदम, बाळासाहेब खताळे, योगेश राजोळे, गणपत भगुरे, दिनकर निकम, सुबोध व्यवहारे, मनसेचे तालुकाध्यक्ष तुषार गांगुर्डे, शैलेश शेलार, अब्दुल शेख, सुयोगराव गायकवाड, अमोल निचित, संदिप धोत्रे, जयेश ढिकले, गणेश कदम, प्रमोद दराडे, आप्पा राजोळे, नितीन निकम, आयुष निकम आदी उपस्थित होते.

# दिंडीतील वारकऱ्यासाठी लातुरच्या सोशल टीमची मायेची सर्वोत्तम छत्री



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : आषाढी एकादशीच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यातून पायी दिंडी काढून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना सर्वोत्तम सोशल टीम लातूर यांच्या वतीने ८० छत्री वाटप करण्यात आली प्रतिवर्षाप्रमाने याही वर्षी आषाढीनिमित्त पायी दिंडी काढून वारकरी ऊन, वारा, पाऊस, यांची तमा न बाळगता पंढरपूर कडे जात आहेत, लातुरच्या सामाजिक क्षेत्रामध्ये आपल्या सामाजिक कार्यातून वेगळी ओळख निर्माण करणारी सोशल टीम लातूर यांनी पायी चालत जाणार्या वारकऱ्यांचा पावसापासून बचाव व्हावा म्हणून दिंडीतील वारकरी बंधू-भगिनींना छत्री वाटप करण्यात आले, मागील सात वर्षांपासून लातुरची सोशल टीम सातत्याने गरजुंना ब्लँकेट वाटप ,पालावर वरील लोकांना दिवाळी फराळ वाटप, अनाथ मुलांसोबत रक्षाबंधन, रक्तदान शिबिर ,राज्यस्तरीय सन्मान सोहळा, महिला दिन, शैक्षणिक साहित्य वाटप, अन्नधान्याची किट वाटप, कपडे वाटप, असे अनेक लोक गरजेचे उपयुक्त सामाजिक कार्य हे टीम करते, याच सदभावनेतुन व वारकरी बंधु भगिनींना छत्री वाटप करण्यात आली.

यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी टिमचे अध्यक्ष उत्तम शेळके, .संजय पंचगले, राजकुमार अग्रवाल, प्रदीप ढेकरे, गंगाधर कासले, गोपीचंद बर्डे, रंजना जगताप, वर्षा कासले, ज्योती जगदाळे, प्रल्हाद ढवळे, पुष्पा टिके, सचिन सावळकर ,नामदेव दयतकर, रजनी जोशी ,सोमनाथ घटकर, बाबुराव बिरादार, रंजना चव्हाण अर्चना तळेकर, वंदना डोंगरे सुनीता राठोड, वनमाला मसलकर यांनी विशेष मेहनत घेत छत्री वाटप केले.

# दादा ग्रुप सोशल फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बऱ्हाणपूर : सालाबाद प्रमाणे यावर्षीही बुऱ्हाणपूर गावात मोहरम निमित्त लहान मुलांचे व गर्भवती महिलांचे आरोग्य शिबिर स्पॅन मेडिकल सेंटर व दादा सोशल फाउंडेशन यांच्या मार्फतठेवण्यात आले होते यावेळी प्रमुख पाहुणे अक्कलकोट तालुक्याचे तहसीलदार आदरणीय मगर साहेब व पोलीस निरीक्षक स्वामी साहेब हे उपस्थिती होते प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आला यावेळी गावातील प्रमुख व्यक्ती असदुला पिरजादे. शायद मिया जागीरदार युसुफ पटेल मैनुद्दीन पटेल अश्रफ अलीपटेल नसिरुद्दीन पिरजादे. कमाल पिरजादे हाशम जागीरदार दादा ग्रुपचे सल्लागार उत्तमजी बनसोडे समीर पिरजादे कमाल जागीरदार नदीम पिरजादे व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.



# बांधकाम कामगार योजनेचा बाजार मांडलेल्या दलालांवर कारवाई करा : दत्ताभाऊ जगताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी-अतुल सोनकांबळे : पुणे (इंदापूर):- लहुजी शक्ती सेना प्रदेश सचिव तथा पुणे जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ जगताप यांच्या वतीने कामगार मंत्री आकाश फुंडकर, कामगार आयुक्त मुंबई, कामगार उपायुक्त यांना इंदापूर तालुक्यासह संपूर्ण राज्यामध्ये बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर झालेल्या बांधकाम कामगार नोंदणी रद्द करण्याबाबत तसेच बांधकाम कामगार सुविधा केंद्र येथील नियमांचे पायमल्ली करणारे कर्मचारी याच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.



या निवेदनामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की,मागील काही वर्षापासून शासनाच्या वतीने असंघटित क्षेत्रातील कामगारांना लाभ देण्यासाठी अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे या योजनांचा बऱ्याच प्रमाणात कामगार व त्याच्या पाल्यांना लाभ मिळत आहे. कामगार कल्याण महामंडळातर्फे योजनेचा लाभ घेण्यासाठी असंघटित क्षेत्रातील ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र लागते परंतु लाभासाठी इंदापूर तालुक्यात अनेक जण एकही दिवस बांधकामावर नसतानाही अनेक कंत्राटदाराने आर्थिक लोभापायी बांधकाम कामगाराच्या फॉर्मवर स्वाक्षरी दिलेल्या आहेत. यामुळे इंदापूर तालुक्यात बांधकाम कामगार झाल्याचे चित्र आहे.

लाभ मिळत असल्याने जे बांधकाम कामगार नाहीत असेही श्रीमंत धनदांडगे लोक लोभापाई योजनेचा अर्ज करून लाभघेत आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात इंदापूर तालुक्यात अनेक एजंट सक्रिय झाल्याचे दिसत आहे या दलाल एजंट लोकांचे थेट संबंध इंदापूर तालुका बांधकाम कामगार सुविधा केंद्र यांच्याशी असल्याने बोगस प्रमाणपत्र दाखल करून अनेकांना बांधकाम कामगार बनवली जात आहे. या अशा बोगस कामगारांमुळे खरे गरजवंत कामगार शासनाच्या योजनांपासून वंचित राहत आहे आणि बोगस कामगार मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. यामुळे इंदापूर तालुक्यातील कामगार कल्याण मंडळातर्फे योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करून बोगस प्रमाणपत्र दाखल करून जे बांधकाम कामगार बनले आहेत याच्या नोंदणी रद्द करण्यात यावी व ज्या कंत्राटदाराने दलाला मार्फत एकही दिवस कामावर न गेलेल्या श्रीमंत धनदांडगे लोकांना आर्थिक लाभाच्या योजनेसाठी बोगस प्रमाणपत्र दिले आहेत अशा कंत्राटदराची चौकशी करून लायसन रद्द करण्यात यावे.

तसेच इंदापूर तालुका बांधकाम सुविधा केंद्र ज्यांच्या मार्फत चालवले जाते त्या कंपनी/एजेन्सीचे टेंडर रद्द करण्यात यावे अशा विविध मागणीचे निवेदन त्यांनी दिले आहे. आणि या वरती आपण लवकरात लवकर कारवाई करावी अन्यथा या विरोधात आम्ही मोठे जन आंदोलन उभा करू अशीही यावेळी दत्ताभाऊ जगताप यांनी सांगितले.

**लोकांपर्यंत पोहोचणार संविधानाचे महत्त्व**

**संविधान जागृतीचे विविध उपक्रम राबविले**

# बार्टी संस्थेच्या वतीने आषाढी वारीत संविधान दिंडीची उत्साही सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था, यांच्या वतीने संविधान दिंडी या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाची आज आळंदी येथे उद्घाटन करण्यात आली.




संविधानाचा अमृत महोत्सव याचे औचित्य साधून आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर या १९ दिवसांच्या प्रवासादरम्यान, संविधानाचे मूल्य, अधिकार आणि प्रस्ताविकेचे महत्त्व वारकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे.

संविधान दिंडीमध्ये सहभागी समताधूतांच्या माध्यमातून पथनाट्य, प्रश्नमंजुषा, प्रस्ताविकेचे वाटप आणि संविधान जागृतीचे विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमाचे मार्गदर्शन सामाजिक न्याय विभागाचे मंत्री श्री. संजय शिरसाठ, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच बार्टीचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

ही संविधान दिंडी पुणे, सातारा व सोलापूर ह्या जिल्ह्यातून जात असून प्रचंड मोठ्या प्रमाणात सहभागी होणारे विठ्ठल भक्त यांना आज संविधानाचे महत्त्व विशद करण्यासाठी संविधान दिंडीचे उद्घाटन आज नातेपुते येथे सर्व महापुरुषांच्या प्रतिमेला हार घालून करण्यात आले. या कार्यक्रमला एन के साळवे(रिपाई जिल्हाधक्ष ) प्रमोद शिंदे पुरोगामी न्यूज चैनल, समीर सोरटे रिपाई अध्यक्ष, अभीजीत वाळके सर एडवोकेट भैय्यासाहेब चांगण एडवोकेट भानुदास राऊत नगरसेवक, शिवाजी अवघडे ( झोपडपट्टी सुरक्षा दल जिल्हाध्यक्ष ) प्रकाश साळवे, संतोष देवकते बादल सोरटे, समीर सोरटे आदी उपस्थिती होते. तसेच सोलापूर प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे मॅडम, नागपूर प्रकल्प अधिकारी हृदय गोडबोले सर, किरण वाघमारे माळशिरस समतादूत, नालंदा शिंदे समतादूत, ज्योती ओहळ समतादूत, कृष्णा आळंदकर जालना समतादूत, अतिश बेंद्रे समतादूत व बार्टी मुख्यालयातील इतर कर्मचारी व समता दूत उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित होते या सर्वांच्या मदतीने ही संविधान दिंडी लोकांपर्यंत संविधानाचे महत्त्व पोहोचवण्याच्या यांचा मानस आहे . तसेच उद्घाटन कार्यक्रमा येथे सर्व भक्तगण सोबत संविधान उद्देशिकेचे वाचन करून सर्वांना मोफत उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.

संविधानाच्या शिक्षणाची गंगा भक्तिरसामध्ये मिसळून लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठीचा हा उपक्रम नक्कीच समाजजागृतीस चालना देणारा असा हा उपक्रम आहे या उपक्रमासोबत बार्टी संस्थेच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कामकाज देखील समता समतादूत यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

# प्रविण मानेंचा बुधवारी भाजप पक्ष प्रवेश निश्चित !

## मुंबई येथील भाजपा पक्ष कार्यालयात होणार प्रवेश...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : राज्यातील राजकीय समीकरणे सतत बदलत असताना इंदापूर तालुका देखील राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. इंदापूर तालुक्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रथमच तिरंगी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकामध्ये महायुती एकत्र लढल्यास क्रिडा मंत्री दतात्रय भरणे आणि प्रविण माने एकत्र येऊन निवडणूक लढविणार असे देखील बोलले जात आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे इंदापूरवर विशेष लक्ष..

**नीरा नरसिंहपूर येथील लक्ष्मी नरसिंह देवस्थान हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कुलदैवत आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्याच्या मातीवर, माणसांवर आणि जनतेवर वेगळे प्रेम आहे, असे देखील मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय यांनी सांगितले आहे. राज्यात व देशपातळीवर भाजप मजबूत होत असल्याने पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात देखील भाजप मजबूत करण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्यान माने यांना भाजप प्रवेशाचे दि. २ जुलै रोजी निमंत्रण दिल्याचे सांगितले आहे.**

२०२४ च्या विधानसभा निवडणूक निकालानंतर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षातून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार प्रवीण माने भाजपमध्ये प्रवेश करणार हे आता निश्चित झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर माने यांच्या पक्षप्रवेशावर शिक्कामोर्तब झाले आहे. दि.२ जुलै रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,आणि प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थिती त्यांचा दिमाखदार पक्षप्रवेश सोहळा निश्चित होणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री यांचे अतिशय निकटवर्तीय असलेल्या एका बड्या राजकीय नेत्यानी हि माहिती लोकनेता शी बोलताना दिली आहे.



**बुधवार दि. २ जुलै रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात माझा पक्ष प्रवेश सोहळ्याचा कार्यक्रम निश्चित झाला आहे. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि आमदार राहुल (दादा)कुल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.**

**– मा.प्रविण दशरथ माने**
**युवा नेते इंदापूर.**

प्रविण माने हे भाजपमध्ये गेल्यास इंदापूरच्या राजकारणात अधिक रंगत येणार असून सत्ताधारी राष्ट्रवादीचे नेते क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि प्रविण माने असा परत एखदा तिरंगी सामना इंदापूरकरांना पाहायला मिळेल.

नवीन समीकरणांची नांदी....

मागील विधानसभा निवडणुकीत प्रविण माने यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती.त्यांच्या नेतृत्वाला आणि तालुक्यातील जनसंपर्काला मोठा प्रतिसाद मिळाला होता.अपक्ष निवडणूक लढवलेले प्रविण माने यांनी ४० हजारांच्या आसपास मतदान घेतले होते,आता त्यांच्या भाजप प्रवेशामुळे इंदापूरच्या राजकारणात नवं समीकरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

भाजपला प्रविण माने यांच्यासारखा तगडा युवक नेता मिळणार असल्याने आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकामध्ये इंदापूर तालुक्यात भाजप आपले वेगळे स्थान निर्माण करू शकते.येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये म्हणजेच काही दिवसातच या संदर्भात इंदापूर तालुक्यात मोठ्या राजकीय घडामोडी होतील, अशी राजकिय स्थिती निर्माण झाली आहे.

परंतु याचा राजकीय फायदा मात्र क्रिडा मंत्री दतात्रय भरणे यांनाच होईल असे जानकार राजकीय मंडळी बोलत आहेत.





## जनता विद्यालय नांदुर्डीत पालक मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथे जनता विद्यालयाचत शनिवार,दि.२८ जून २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास बोराडे हे होते.प्रमुख उपस्थिती उच्च माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ निकम, अभिनव बाल विकास मंदिर अध्यक्ष सिताराम ढोमसे, लक्ष्मण निकम,उगांव बिटचे पोलिस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, स्कुल कमिटी सदस्य, प्राचार्य म्हसकर बी.डी, पर्यवेक्षिका रणशुर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य म्हसकर यांनी केले. शाळेचा २०२४-२५ चा आढावा टी. जी.शिंदे यांनी मांडला. जाधव डी.जी.यांनी विद्यार्थी वर्तन व शिस्त या विषयी मार्गदर्शन केले.आर.व्ही.पगारे व श्रीम. मोतिंगे यांनीही आपले विचार व्यक्त केले. उगांव बिटचे पोलिस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे यांनी पालकांना सायबर क्राईम याविषयी मार्गदर्शन केले. नवनाथ डुकरे व डॉ.संजयकुमार आहेर यांनी उपस्थित पालक व माता पालकांच्या सहकार्याने विविध समित्यांची स्थापना केली.

या प्रसंगी नांदुर्डी सावरगाव पंचकेश्वर देवपूर कुंभारी खडक माळेगाव सारोळे रानवड कुंदेवाडी शिवडी खेडे परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीम.गांगुर्डे व शिंदे यांनी केले. निवड झालेल्या सदस्यांचे गुलाब पुष्प देऊन अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक- शिक्षकेत्तर सेवकांनी परिश्रम घेतलेत.

## स्वर्गीय कै.मारुती सोनवणे (पाटील) मित्र परिवाराच्या वतीने शेकडो विठ्ठल भक्तांसाठी अन्नदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर शहरात संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचा एक दिवस मुक्काम होता. त्यानिमित्ताने इंदापूर नगरी दुमदमून निघाली. संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा इंदापूरात दाखल होताच स्वर्गीय कै.मारूती सोनवणे (पाटिल) मित्र परिवार आणि इंदापुर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष व इंदापूर नगरपरिषदेचे मा.नगरसेवक दादासाहेब सोनवणे परिवाराच्या वतीने शेकडो वारकरी व विठ्ठल भक्तांसाठी जेवणाची उत्तम सोय केली होती.

तरी हजारो वारकरी भक्तानीं जेवणाचा आस्वाद घेतला.





यावेळी सोमनाथ सोनवणे, सतिश सोनवणे, सौ. विजयाताई खंडाळे,उज्वला आरडे. यांनी विषेश सहकार्य केले.तसेच विलास सोनवणे,ज्ञानेश्वर सोनवणे, विकास सोनवणे, सागर सोनवणे, समिर सोनवणे, दिग्विजय सोनवणे, सनी सोनवणे, मिलन सोनवणे, अजय सोनवणे, रवी सोनवणे, सुमित आरडे, दिपक सोनवणे, सोमनाथ खंडाळे, सुरज खंडाळे, किरण खंडाळे, अक्षय कुचेकर, चाँद खंडाळे, अभिषेक कुचेकर,उत्तम कुचेकर, किशोर ढावरे, यांनी परिश्रम घेतले. बाळासाहेब आडसुळ, राजु शिंदे, मुकिंद (आप्पा ) शिंदे, बंडू साठे, सोहम सोनवणे,आप्पा किशोर ढावरे, सोमनाथ ढावरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता सहकार्य केले.

### विरुद्ध दिशेने वाहन चालवून एकास जखमी होण्यास कारणीभूत; एकावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : दुचाकी क्रमांक एमएच.१३.ईएन.८२२९ यावरून फिर्यादी सोमनाथ दत्तात्रय अंबुरे (वय-३८,रा.उत्तर कसबा,सळई मारुती जवळ) हे घराकडे जात असताना दत्त चौक कडून वनवे मार्गे विरुद्ध दिशेने मोटारसायकल क्रमांक एम.एच.१३. सी.एल.९५४५ यातील चालक रफिक इरफान पटेल (वय-३०,रा.ए ग्रुप जुना विडी घरकुल) याने त्याच्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने चालून फिर्यादी सोमनाथ अंबुरे यांना धडक देऊन उजव्या पायाचे हाड फॅक्चर करण्यास कारणीभूत झाल्याचे फिर्याद सोमनाथ अंबुरे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रफिक पटेल याच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हि घटना २१ जून रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास नवी पेठ येथे घडली. तपास सहायक फौजदार भालशंकर हे करीत आहेत.

## शेतकऱ्यांचा काटा मारणाऱ्या केळी व्यापाऱ्यांचा काटा काढू : अतुल खूपसे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : प्रत्येक जण त्याला लुटणारा, फसवणारा, आणि त्याला बळी पडणारा प्राणी म्हणजे बळीराजा!

शेतकरी म्हटले की त्याला कोणीही जगू देत नाही मले व्यापारी असेल, महान धारक असेल, तसेच पोलीस प्रशासन असेल, कोणीही त्याला सोडत नाही, शेतकरी आपला रात्रंदिवस कष्ट करून पोटाच्या मुलाप्रमाणे जोपासलेली पीक अथवा धान्य बाजारात घेऊन जात असतो त्यावेळी सुरुवात पोलीस प्रशासनाकडून होते व शहराच्या बाहेर पोलीस दादा थांबलेले असतात ते गाडी अडवून त्याला त्रुटी दाखवतात व गाडीचे पासिंग एवढे आहे या गाडीत ओव्हरलोड आहे तुम्हाला एवढे दंड भरावे लागेल एवढे दंड भरावे लागेल म्हणून त्या वाहनधारकाला सोडून सोडतात शेवटी त्या वाहन दर्गा बरोबर शेतकरीही त्याच वाहनात प्रवास करून असतो या प्रसंगी वाहनदाराची शेतकऱ्यांनाच म्हणणारा दादा हा दंड भरला पाहिजे अन्यथा माझ्या गाडीवर कारवाई होईल म्हणून चालक ही त्या दंडाची रक्कम शेतकऱ्याकडून घेत असतो हा झाला पहिला झटका.

त्यानंतर तो शेतकरी घेऊन मार्केटमध्ये गेला तर व्यापारी मान असाच आहे तसाच आहे मलाच हवाच आहे असे सांगून सोन्यासारख्या मालाचे मातीमोल किंमत करून तो खरेदी करत असतो हा दुसरा झटका.

यानंतर फळबाग शेतकरी आपला केळीचा एखाद्या व्यापाऱ्याला विकत असतो मात्र तिथेही त्यांची फसवणूक होते त्या व्यापाऱ्याकडे जे मालवाहतूक करणारे वाहन चालक असतात त्यांनी तो व्यापारी हाताची धरून ते वाहन तनेज काट्यावर लिहून जातात आणि त्या रिकाम्या वाहनाची वजन २१०० किलो वजन असेल तर तो व्यापारी शेतकऱ्याला रिकाम्या वाहनाची वजन २४ रुपये आहे असे सांगून इथे शेतकऱ्यांचा तीनशे किलो मारतो आणि मुळातच शेतकरी राजा हा प्रत्येकावर विश्वास ठेवणारा व सरळ मार्गे असतो व त्याच्या त्या विश्वासाला तळा देण्याची काम व्यापारी करतात असे प्रकार सोलापूर जिल्ह्यासह करमाळा तालुक्यातील कंदर जेऊर टेंभुर्णी येथे जिथे केळीच्या फळबागा आहेत तिथेही प्रहार घडत आहेत यामध्ये वाहनधारकांचा काही फायदा नसतो कारण वाहनधारकाने खरे वजन शेतकऱ्यास सांगितले तर तो व्यापारी परत ते वाहन शेतीमालाच्या किंवा फळ बघायच्या मालाला लावत नाही मुळातच मंदी असल्यामुळे वाढते गाड्यांचे प्रमाण वाढते डिझेलची किंमत पाहता वाहनाची भाडे मिळत नसल्यामुळे निपुटपणे ते वाहनधारक गप्प बसतात असे प्रकार सर्रास घडत आहेत त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी बारकाईने लक्ष देऊन कोणावरही विश्वास न ठेवता रिकामा गाडीचे वजन करताना समक्ष शेतकऱ्यांनी हजर राहणे गरजेचे असून त्यामुळे व्यापारी तुपाशी आणि शेतकरी उपाशी असे घडत आहे याला हाळा घालण्यासाठी शेतकऱ्यांनी सतर्क राहणे काळाची गरज आहे असे आव्हान जनशक्ती शेतकरी संघटनेची अतुल खूपसे पाटील यांनी केले.



## संक्राळचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर वामनराव सुर्यवंशी यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील नागरसोगा गावचे सुपुत्र तथा संक्राळ येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक आदर्श शिक्षक ज्ञानेश्वर सुर्यवंशी हे वयोमानानुसार सेवेतुन सेवानिवृत झाल्याने आज मातौळा केंद्राच्या वतिने मातोळा येथील जिल्हा परीषद कन्या शाळेमध्ये सेवापुर्ती सोहळा संपन्न झाला. सहशिक्षक ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांनी आपल्या २७ वर्षाच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थी घडवण्याच काम केल असुन, समाजकार्यातही ते अग्रेसर असायचे. यावेळी शिक्षक पतसंस्थेचे व्हॉ चेअरमन हरीश अयतनबोने, सचिव संजय जगताप, शिक्षक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दयानंद बिराजदार, कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष रवी कुरील, जवळगा केंद्राचे केंद्रप्रमुख राठोठ एन बी, मातोळा केंद्राचे केंद्रप्रमुख रमेश जाधव, लटुरे सर, चंदन राठोड,मोरे सर, भोसले, कावळे सर, बोने सर, नागरसोगा सरपंच सरोजा भास्कर सुर्यवंशी, चेअरमन यशवंत शिंदे, संजय शिंदे शाम फावडे, सतीश बेडगे, निलेश सुर्यवंशी धिरज पाटील, माणिकराव पाटील, प्रकाश सुर्यवंशी, दादा माळी, मोहन काळे, प्रकाश कुमठे, किशोर भोसले, परीवारातील सदस्या सह केंद्रातील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थीत होते.

**माणगांव तालुका बौद्ध समाज समन्वय समितीचा उपक्रम**

**मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची उपस्थिती**





## माणगाव येथे विद्यार्थी गुणगौरव आणि सेवा निवृत्त कर्मचारी भिमरत्न पुरस्कार सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड ) सालाबाद प्रमाणे या ही वर्षी माणगांव तालुका बौद्ध समाज समन्वय समितीच्या माध्यमातून माणगांव तालुक्यातील बौद्ध समाजातील इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी गुणगौरव आणि सरकारी, निमसरकारी सेवा निवृत्त कर्मचार्यांना भिमरत्न पुरस्कार प्रदान सोहळा माणगांव तालुक्यातील बौद्ध समाजातील दहावी ते पदवी, पदव्युत्तर कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी शैक्षणिक क्षेत्रातील उत्तीर्ण विद्यार्थी, पालक वर्ग, सरकारी निमसरकारी सेवा निवृत्त कर्मचारी, प्रमुख पाहुणे, माणगांव तालुका बौद्ध समाज समन्वय समितीचे विद्यमान पदाधिकारी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे दिग्गज, उद्योजक, दानशूर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, धम्म उपासक, उपासिका आणि बौद्ध समाज यांच्या लक्षवेधी उपस्थितीत रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता मोतीराम बॅन्केट हॉल माणगांव येथे माणगांव तालुका बौद्ध समाज समन्वय समितीचे अध्यक्ष, कामगार नेते, एड. यशवंत गंगावणे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाची सुरुवात मानवी आदर्शांच्या प्रतिमांना पुष्प माल्यार्पण करून सामुदायिक रीत्या त्रिशरण पंचशील घेऊन करण्यात आली. त्या नंतर प्रमुख पाहुणे, मान्यवरांचे मार्गदर्शनपर मनोगत, प्रास्ताविक, अध्यक्षीय मार्गदर्शनपर मनोगत, ठराव, मान्यवरांचे स्वागत त्या नंतर अल्पोपहार, विद्यार्थी गुणगौरव आणि सरकारी, निमसरकारी सेवा निवृत्त कर्मचार्यांना भिमरत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

सदर कार्यक्रमाला रायगड जिल्ह्यातील नामवंत उद्योजक, महा दानशूर व्यक्तीमत्व, सामाजिक चळवळीचे प्रमुख आधारवड मा. नरेश भाई अहिरे साहेब, मा. सरपंच, कृषी उत्पन्न बाजार समिती मा. उपसभापती नाडकर, जेष्ठ कार्यकर्ते मोरे बाबा, पत्रकार मसुरे आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीत मान्यवर, माणगांव तालुका बौद्ध समाज समन्वय समितीचे अध्यक्ष कामगार नेते मा. एड यशवंत गंगावणे, कोषाध्यक्ष मा. सुर्यकांत कासे, सह कोषाध्यक्ष मा. संतोष कासारे, उपाध्यक्ष मा. रविंद्र जाधव, उपाध्यक्ष मा. अमोल मोहिते, सचिव मा. एड राकेश मोरे, सहसचिव मा. दिपक मोरे, सल्लागार मा. मधुकर सकपाळ, प्रसिद्धी प्रमुख पत्रकार विश्वास गायकवाड, सल्लागार मा. जनार्दन सावंत, सल्लागार मा. रमेश घोगरे, सल्लागार मा. बाळाराम शेलार, संघटक मा. किरण शेलार, संघटक मा. निलेश साळवी, संघटक महिला प्रतिनिधी मा. सौ. योजना लोखंडे इत्यादी पदाधिकारी, पत्रकार गौतम जाधव आणि असंख्य उपासक, उपासिका, धम्म बांधव, धम्म भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मा. एड. राकेश मोरे यांनी केले. तर प्रास्ताविक मा. सुर्यकांत कासे यांनी केले आणि अध्यक्षीय मार्गदर्शन मा. एड. यशवंत गंगावणे यांनी केले. सदर कार्यक्रमात कोकण रेल्वे वीर रेल्वे स्थानकाला विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्या संदर्भातील ठराव, कोकण रेल्वे स्थानका वरील माणगांव व वीर रेल्वे स्थानकात विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीची तैलचित्रे लावण्या संदर्भातील ठराव आणि माणगांव शहरात बहुजनांचे राजे, बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्या संदर्भातील ठराव घेण्यात आले. त्या नंतर विद्यार्थी गुणगौरव आणि सेवा निवृत्त कर्मचारी गौरव, ऋण निर्देश आणि त्या नंतर स्नेह भोजन करून कार्यक्रमाची सु सांगता करण्यात आली.